**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(असाधारण)**
**अधिसूचना**

**क्रमांक : १५६/२०१५** **दिनांकः ११/१२/२०१५**

**विषय : शैक्षणिक नियामिका .... शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७**

सर्व संबंधितांच्या माहिती करीता अधिसूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ ची शैक्षणिक नियामिका खालील प्रमाणे राहील.

(१) वार्षिक पद्धतीने आणि सत्र पद्धतीने राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांकरीता शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील प्रथम सत्र, हिवाळी दीर्घ सुटी, द्वितीय सत्र आणि उन्हाळी दीर्घसुटी व त्यांचे अवसान खालील तक्ता-१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील.

**तक्ता -१**

| अ. क्र. | सत्र/ दीर्घ सुटी | संकेताक्षर | पासून | पर्यंत |
|---|---|---|---|---|
| १. | प्रथम सत्र | अ | सोमवार, दि. १३ जून, २०१६ | शनिवार, दि. २२ ऑक्टोबर, २०१६ |
| | | ब | सोमवार, दि. १३ जून, २०१६ | शनिवार, दि. २२ ऑक्टोबर, २०१६ |
| | | क | सोमवार, दि. १३ जून, २०१६ | शनिवार, दि. २२ ऑक्टोबर, २०१६ |
| २. | हिवाळी दीर्घसुटी (१) | अ | रविवार, दि. २३ ऑक्टोबर, २०१६ | रविवार, दि. ६ नोव्हेंबर, २०१६ |
| ३. | हिवाळी दीर्घसुटी | ब | रविवार, दि. २३ ऑक्टोबर, २०१६ | रविवार, दि. १३ नोव्हेंबर, २०१६ |
| | | क | रविवार, दि. २३ ऑक्टोबर, २०१६ | रविवार, दि. १३ नोव्हेंबर, २०१६ |
| ४. | प्रथम सत्र (उर्वरित) | अ | सोमवार, दि. ७ नोव्हेंबर, २०१६ | शनिवार, दि. १७ डिसेंबर, २०१६ |
| ५. | हिवाळी दीर्घसुटी (२) | अ | रविवार, दि. १८ डिसेंबर, २०१६ | रविवार, दि. २५ डिसेंबर, २०१६ |
| ६. | द्वितीय सत्र | अ | सोमवार, दि. २६ डिसेंबर, २०१६ | शनिवार, दि. २० मे, २०१७ |
| | | ब | सोमवार, दि. १४ नोव्हेंबर, २०१६ | शनिवार, दि. ६ मे, २०१७ |
| | | क | सोमवार, दि. १४ नोव्हेंबर, २०१६ | शनिवार, दि. २९ एप्रिल, २०१७ |
| ७. | उन्हाळी दीर्घसुटी | अ | रविवार, दि. २१ मे, २०१७ | रविवार, दि. १८ जून, २०१७ |
| | | ब | रविवार, दि. ७ मे, २०१७ | रविवार, दि. १८ जून, २०१७ |
| | | क | रविवार, दि. ३० एप्रिल, २०१७ | रविवार, दि. ११ जून, २०१७ |

**अ = विद्यापीठाचे शैक्षणिक विभागामधील सर्व अभ्यासक्रम.**
**ब = विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील अभियांत्रिकी व तांत्रिकी विद्याशाखेमधील सर्व अभ्यासक्रम.**
**क = विद्यापीठाशी संलग्नित उर्वरीत महाविद्यालयांतील सर्व अभ्यासक्रम.**

(२) विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग/विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शैक्षणिक कर्मचाऱ्यांना वरील परिच्छेद (१) मधील तक्ता-१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे हिवाळी/उन्हाळी दीर्घ सुट्या व्यतिरिक्त खालील तक्ता-२ मध्ये दर्शविलेल्या सार्वजनिक सुट्या राहतील.

**तक्ता -२**

| अ. क्र. | सण | दिवस व दिनांक |
|---|---|---|
| १. | रमजान ईद | बुधवार, दि. ६ जूलै, २०१६ |
| २. | स्वातंत्र्य दिन | सोमवार, दि १५ ऑगस्ट, २०१६ |
| ३. | पारशी नववर्ष दिन (पतेती) | बुधवार,दि १७ ऑगस्ट, २०१६ |
| ४. | गणेश चतुर्थी | सोमवार, दि. ५ सप्टेंबर, २०१६ |
| ५. | सर्वपित्री अमावास्या | शुक्रवार, दि. ३० सप्टेंबर, २०१६ |
| ६. | दसरा | मंगळवार, दि. ११ ऑक्टोबर, २०१६ |
| ७. | गुरुनानक जयंती | सोमवार, दि. १४ नोव्हेंबर, २०१६ |
| ८. | ईद-ए-मिलाद | सोमवार, दि. १२ डिसेंबर, २०१६ |
| ९. | ख्रिसमस | रविवार, दि. २५ डिसेंबर, २०१६ |
| १०. | प्रजासत्ताक दिन | गुरुवार, दि. २६ जानेवारी, २०१७ |
| ११. | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | रविवार, दि. १९ फेब्रुवारी, २०१७ |
| १२. | महाशिवरात्री | शुक्रवार, दि. २४ फेब्रुवारी, २०१७ |
| १३. | होळी (धूलिवंदन) | सोमवार, दि. १३ मार्च, २०१७ |

| | | |
|---|---|---|
| १४. | गुढी पाडवा | मंगळवार, दि. २८ मार्च, २०१७ |
| १५. | श्रीराम नवमी | बुधवार, दि. ५ एप्रिल, २०१७ |
| १६. | महावीर जयंती | रविवार, दि. ९ एप्रिल, २०१७ |
| १७. | गुड फ्रायडे | शुक्रवार, दि. १४ एप्रिल, २०१७ |
| १८. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | शुक्रवार, दि. १४ एप्रिल, २०१७ |

(३) शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ मधील संस्थानिहाय प्रथम सत्रारंभापासून तर द्वितीय सत्रावसानापर्यंत उपलब्ध होणाऱ्या (रविवार, हिवाळी दीर्घ सुटी (रविवार वगळून), सार्वजनिक सुट्या मिळून एकूण दिवस, एकूण शैक्षणिक दिवस, प्रवेश, परीक्षा उपक्रम, अध्यापनरहीत एकूण दिवस, आणि अध्यापनासाठी उपलब्ध असलेले) एकूण दिवसांची सांख्यिकीय माहिती खालील तक्ता-३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

**तक्ता-३**

**(Under U.G.C. Regulation 2010)**

| **Categorization** | **Number of Weeks (6 Day a Week Pattern)** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **Prescribed** | | **Actual for University Departments** | | | **Actual for Affiliated Colleges** | | |
| | University | College | First Session | Second Session | Total | First Session | Second Session | Total |
| Teaching & Learning Process | 30 | 30 | 15.2 | 15.1 | 30.3 | 15 | 15.4 | 30.4 |
| Admissions/ Examinations | 12 | 10 | 6.2 | 5.4 | 12 | 3 | 7 | 10 |
| Vacation | 8 | 10 | 3 | 4 | 7 | 3 | 6 | 9 |
| Public Holidays | 2 | 2 | 1.2 | 1.1 | 2.3 | 1 | 1.2 | 2.2 |
| Total | 52 | 52 | 26 | 26 | 52 | 22 | 30 | 52 |

**Notes:** (i) Public Holidays are being increased by adjusting vacation.
(ii) 0.1 Week means 01 day and 1 Week means 6 days.

(४) अध्यापनासाठी उपलब्ध असलेल्या दिवसांपेक्षा जास्त दिवस अध्यापनासाठी उपलब्ध होतील या दृष्टीने विद्यापीठ शैक्षणिक विभाग प्रमुखांनी/ संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी प्रयत्न करावा.

(५) शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये अध्यापन कार्य एकूण किती दिवस करण्यात आले या संबंधीची माहिती शैक्षणिक विभाग प्रमुखांनी / प्राचार्यांनी शैक्षणिक वर्षाच्या अखेरीस विद्यापीठास कळवावी.

(६) विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील / विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शैक्षणिक कर्मचाऱ्यांना तक्ता-२ मध्ये दर्शविण्यात आलेल्या सुट्यांव्यतिरिक्त राज्य शासनाने जाहीर केलेल्या इतर सुट्या आणि/अथवा जिल्हाधिकाऱ्यांनी जाहीर केलेल्या सुट्या उपभोगता येणार नाहीत.

स्वा/-
(डॉ. अजय प्र.देशमुख)
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(असाधारण)**
**अधिसूचना**

**क्रमांक : ३०/२०१६** **दिनांक : ७/६/२०१६**

**विषय : शैक्षणिक नियामिका .... शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ ला शुध्दीपत्रक**
**संदर्भ : अधिसूचना क्र. १५६/२०१५, दि. ११.१२.२०१५**

सर्व संबंधितांच्या माहिती करीता अधिसूचित करण्यात येते की, संदर्भांकित अधिसूचना क्र. १५६/२०१५ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ करीता शैक्षणिक नियामिका यापूर्वी प्रसिध्द केली आहे. सदर शैक्षणिक नियामिकेत खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

सदर शैक्षणिक नियामिकेतील 'तक्ता-१' मध्ये अ.क्र. १ अंतर्गत संकेताक्षर 'ब' अन्वये विद्यापीठाशी संलग्नित सर्व अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालयांचे प्रथम सत्र 'सोमवार, दि. १३ जून, २०१६' ऐवजी 'सोमवार, दि. २० जून, २०१६' पासून सुरु होईल. तसेच अ.क्र. ३ अंतर्गत संकेताक्षर 'ब' अन्वये जाहीर केलेली हिवाळी दीर्घसुटी 'रविवार, दि. १३ नोव्हेंबर, २०१६' ऐवजी 'रविवार, दि. ६ नोव्हेंबर, २०१६' पर्यंत राहील. त्यानुसार अ.क्र. ६ अंतर्गत संकेताक्षर 'ब' अन्वये विद्यापीठाशी संलग्नित सर्व अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालयांचे द्वितीय सत्र 'सोमवार, दि. १४ नोव्हेंबर, २०१६' ऐवजी 'सोमवार, दि. ७ नोव्हेंबर, २०१६' पासून सुरु होईल.

संदर्भांकित अधिसूचनेत उल्लेखित इतर बाबी जशाच्या तशा लागू राहतील.

तसेच उपरोक्त बदलामुळे, शैक्षणिक नियामिका २०१५-२०१६ ला अधिसूचना क्र. १५७/२०१५, दि. ११.१२.२०१५ अन्वये सुचविलेला बदल मागे घेण्यात येत आहे.

स्वा/-
(डॉ. अजय प्र.देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ